# कर्तृत्ववानांची नाळ आजही जुळलेली!

## ‘शोध मराठी मनाचा’ संमेलनात उलगडला दिग्गजांचा प्रवास

- देश-विदेशात कर्तृत्व गाजवणाऱ्या दिग्गजांनी केले मन मोकळे
- रवी सावंत, उदय लाड, मंदार जोगळेकर, जयु भाटकरांचा आठवणींना उजाळा

**प्रतिनिधी**
रत्नागिरी

जागतिक मराठी अकादमीच्या ‘शोध मराठी मनाचा’ संमेलनामध्ये ‘मुक्काम पोस्ट रत्नागिरी’तून रत्नागिरीचे सुपुत्र असलेले आणि आज देश-विदेशात कर्तृत्व गाजवणारे दिग्गज समोर आले. मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष रवी सावंत, ‘बुकगंगा’द्वारे जगभर मराठी पुस्तकांना पोहोचवणारे मंदार जोगळेकर, चित्रपट निर्माते उदयदादा लाड आणि दूरदर्शनवरील निर्माते जयु भाटकर यांनी या कार्यक्रमांतून रत्नागिरीतील आठवणींना उजाळा दिला. त्यांच्या मनोगतात आजही त्यांची नाळ रत्नागिरीशी जोडलेली असल्याचे प्रकर्षाने जाणवले. हा कार्यक्रम विद्यार्थीवर्गासाठी प्रेरणादायी ठरला.

### रत्नागिरींचे संस्कार कायम : उदयदादा लाड

निर्माते उदयदादा लाड यांनी आपण रत्नागिरीत माझ्यावर खेळाचे, शिक्षणाचे, गुरूजनांचे संस्कार झाले जे मला आयुष्यभर पुरले. आमच्यावेळी



कबड्डीपटूंना रत्नागिरीत ग्लॅमर होते, हॉटेलवाले बोलवून डिंकलाडू, मसाला दूध देत असत. मैदानी खेळ हा माझा आत्मा होता. आज ७१ व्या वर्षी मी मुक्त विद्यापीठातून पदवीधर होण्यासाठी प्रयत्न करतोय. मला समाजासाठी काही केल्याचे समाधान घेऊन या जगाचा निरोप घ्यायचाय. यासाठी युवारेल फाऊंडेशनची स्थापना केली आहे. या माध्यमातून मी शाळा, हॉस्पिटल, चांगल्या व्यक्ती आणि संस्थांना मदत करतोय, असे त्यांनी सांगितले.

### मी रत्नागिरीचाच : रवि सावंत

मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष रवी सावंत यांनी आजही मला देश-विदेशात कुठेही ‘तुम्ही कुठले?’ असे विचारले की, ‘मी रत्नागिरीचा’ असे उत्तर देत असल्याचे सांगितले. रत्नागिरीत असताना आंबा पाडण्यासाठी मारलेल्या दगडातूनही मी अचूक नेम साधणे आणि वेगात

पान ६ पहा

# कर्तृत्ववानांची नाळ आजही जुळलेली!



रत्नागिरी : 'मुक्काम पोस्ट रत्नागिरी' कार्यक्रमात बोलताना रवी सावंत, सोबत उदयदादा लाड, जयु भाटकर आणि मंदार जोगळेकर.

पान १ वरुन

चेंडू फेकण्यासारख्या गोष्टी शिकलो. आयुष्यात कुठलीही गोष्ट लक्षपूर्वक केलीत तर तुम्ही नक्की यश साध्य करू शकता. कलाकाराला आपला मित्र बनवा तो तुम्हाला नैराश्यातून बाहेर काढले, असा संदेश दिला. तसेच यावेळी त्यांनी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, सुनील गावसकर, राहुल द्रवीड, विनोद कांबळी आदींच्या मोठेपणाचे किस्से सांगितले.

**या भूमीतील अवखळपणा आपल्यातही : जयु भाटकर**

दूरदर्शनवरील निर्माते जयु भाटकर यांनी रत्नागिरीतील आपल्या अवखळपणा अत्यंत प्रामाणिकपणे सांगितला. येथील महाविद्यालयीन दशेतील व्यसन, भांडणे आदींचे किस्से अगदी मनमोकळेपणे सांगितले. मात्र याचवेळी आपल्याला अशा काही थोर व्यक्ती भेटल्या ज्यांनी आपल्या आयुष्याला कलाटणी दिली आणि आपण यातून बाहेर पडलो. पाटणकर सरांनी माझ्या आवाजातील निवेदकाचा आवाज ओळखला आणि मला आकाशवाणीवर जाण्यास सांगितले. तिथून दूरदर्शनपर्यंतचा प्रवास झाला. यामध्ये आईची भूमिका अधिक खंबीरपणे पाठीशी उभी राहाणारी होती. मी रत्नागिरी सोडताना तिला नमस्कार केल्यावर तिने वाक्य सांगितले की, 'लेका मोटो हो, पण खोटो होव नको' आज ती माझी कॅचलाईन असल्याचे भाटकर यांनी सांगितले.

**जिद्द बाळगा : मंदार जोगळेकर**

साखरप्याचे सुपुत्र असलेल्या मंदार जोगळेकर यांनी 'बुकगंगा'च्या ई-बुकच्या माध्यमातून आज मराठी पुस्तके जगभर पोहोचविली आहेत. या कार्यक्रमात त्यांनीही आपल्या आठवणींना उजाळा दिला. १० पर्यंतचे साखरप्याला शिक्षण झाले. मनातली जिद्द, आत्मविश्वास बाळगा आणि सकारात्मकदृष्टीने ते पादाक्रांत करण्यासाठी प्रयत्न केल्यास यश निश्चित मिळेल, असा संदेश जोगळेकर यांनी यावेळी दिला. सूत्रसंचालन दूरदर्शनचे नितीन केळकर आणि रत्नागिरी आकाशवाणीचे सुहास विद्वांस यांनी केले.